# नियमित दिवाणी दावा क्र. ५६३/२०२५ मधील नि.क्र. १७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांच्याविरुध्द पारीत झालेला नि.क्र. १ वरील एकतर्फा आदेश रद्द करुन मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांचे कथन की, प्रतिवादी क्र. १ या सदर प्रतिवादी यांच्या आई असून त्या मागील काही काळात खूप आजारी असल्यामुळे सदर प्रतिवादीस सदर प्रकारणाबाबत वकिलांना माहिती देणे शक्य झाले नाही तसेच त्यांची काळजी घेणे व त्यांची देखभाल करण्यास कोणी नसल्याने व कायद्याचे अपूर्ण ज्ञान असल्याने न्यायालयात हजर राहणे शक्य झाले नाही. त्यामुळे, सदर प्रतिवादीविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. वादीचे कथन की, प्रस्तुतचा अर्ज खोटा असून तो वादीस मान्य नाही. तसेच, अर्जातील कथनाच्या पुष्टयर्थ कोणताही पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा डिक्लरेशन व निरंतर ताकिद मिळणेकामी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. २ यांचेविरुध्द दि. ३०.०१.२०२६ रोजी नि.क्र. ०१ वरील आदेशानुसार एकतर्फा आदेश पारित झाले असल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तीक असल्याचे दिसून येत नसले तरी प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली होणे कामी प्रतिवादी क्र. २ यांस लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देणेकामी त्यांच्याविरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सदर प्रतिवादीस झालेला विलंब विचारात घेता संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. परंतु, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास सदर प्रतिवादीचे

नुकसान होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज सदर प्रतिवादी यांना झालेला विलंब विचारात घेता खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश :-

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी वादीस खर्च रक्कम रु.३००/- (अक्षरी तीनशे रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २ | प्रतिवादी क्र. २ यांनी सदर खर्च रक्कम वादीस दिल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादी क्र. २ विरुध्द नि.क्र. १ वर दिनांक ३०.०१.२०२६ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल ठरविण्यात येतो. |
| ३ | प्रतिवादी क्र. २ यांनी सदर खर्च रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी. |

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.03.18 16:35:30 +0530

दि. १८/०३/२०२६

**(अनय ज्ञा. कुलकर्णी)**
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
माढा.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 18/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 20/03/2026 |